संकटं ही संधींचे रूप असते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १५ मे २०२५ | अंक १५३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# भारतापासून ४००० किलोमीटर दूर आहे तुर्की, तरीही का बनला आपला दुश्मन ?

काश्मीरच्या पहलगाममध्ये अतिरेक्यांनी २६ पर्यटकांची हत्या केल्यानंतर भारत आणि पाकिस्तानात झालेल्या संघर्षात तुर्कीने पाकिस्तानला सातत्याने मदत केली आहे.दोन्ही देशांच्या संघर्षात तुर्कीने पाकिस्तानची मदत करणे हे काही नवीन नाहीए...पाकिस्तानला तुर्कीने दिलेल्या ड्रोनच्या सहाय्याने पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही देशात सुरु असलेल्या संघर्षात तुर्कीने नेहमीच पाकिस्तानची बाजू घेतलेली आहे. खासकरुन काश्मीर मुद्द्यावर तुर्कीने नेहमीच पाकिस्तानला पाठींबा दिला आहे. भारतापासून ४००० हजार किमीवर असलेला हा देश भारताचा जानी दुश्मन का बनला ते पाहूयात... तुर्की राष्ट्राध्यक्ष एर्दोगान यांची मुस्लिम उम्माहच्या नेतृत्वाची महत्वाकांक्षा असल्याने तो सातत्याने पाकिस्तानचे समर्थन करत आला आहे. तुर्कीची सीमाला चीन सारखी आपल्या देशाला लागून नाही त्यामुळे जमिनीचाही कोणताही वाद नसतानाही तुर्की केवळ धर्मासाठीच पाकची तळी उचलून धरत असल्याचे स्पष्ट आहे. 1948 पासून तुर्कियेचे भारताशी संबंध भारतापासून सुमारे 4000 किलोमीटर हवाईअंतरावर तुर्की आहे. तुर्की आशिया आणि युरोप दोघांचा हिस्सा आहे. तुर्कीचा जादा हिस्सा हा आशियात मोडतो. आणि एक छोटासा हिस्सा युरोपात येतो. त्यामुळेच तुर्की नाटोचाही सदस्य आहे.भारत आणि तुर्की दरम्यान 1948 मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले होते. जास्तीत जास्त काळ



दोन्ही देशांचे संबंध चांगले राहीले आहेत. परंतू अलिकडे राष्ट्राध्यक्ष रेचेप तैय्यप अर्दोआन यांच्या सत्तेत आल्यानंतर दोन्ही देशांच्या नात्यात कटूता आली आहे. मग भारताच्या विरोधात का ?

भारत आणि तुर्की यांच्या दरम्यान कोणत्याही मुद्यावरुन झडप झालेली नाही. तरीही एर्दोगान ( २००३ ) सत्तेत आल्यानंतर तो पाकिस्तानची बाजू घेत आला आहे आणि काश्मीरच्या मुद्द्यावर भारताच्या विरोधात राहीला आहे. वास्तविक एर्दोगान यांचे स्वत:चे राजकारण मुस्लीम कट्टरतावादाकडे झुकलेले आहे. त्याच कारणाने पाकिस्तानची साथ देऊन ते आपल्या मतदारांना खुश करु इच्छित आहे.त्यामुळे त्यांना त्यांच्या देशातील कट्टर पंथीयांचे समर्थन मिळत आहे. त्याच जोरावर ते सत्तेत टीकून आहेत. त्याचमुळे ते सातत्याने भारताच्या विरोधात बोलत असतात. तसेच एर्दोगान तुर्कीला ऑटोमन साम्राज्यसारखा प्रभाव शाली बनविण्याचे स्वप्नही भारत विरोधी स्टँडचे कारण आहे. तुर्की मुस्लिम उम्माह म्हणजे सर्व मुस्लीम देशांना एकत्र येण्याची विनंती करताना दिसत आहेत. एर्दोगान यांना मुस्लीम जगताचा नेता बनण्याचे स्वप्न त्यांना पाकच्या बाजूने आणि भारताच्या विरोधात भूमिका घ्यायला भाग पाडत आहे. भारत विरोधी भूमिका महागात पडणार ? भारत-पाकिस्तानच्या दरम्यान अलिकडेच झालेल्या युद्धजन्य परिस्थितीतही तुर्कीने पाकिस्तानची तळी उचलून धरली आहे.त्याचा मोठा फटका तुर्कीला बसणार आहे.भारतात तुर्कीच्या विरोधात बायकॉट मोहीम सुरु झाली आहे.

लोक तुर्कीच्या सामानावर बहिष्कार घालण्याचे आवाहन करीत आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ब्लॅकस्टोन समूहासोबत सामंजस्य करार

## महाराष्ट्रात 5,127 कोटींची थेट परकीय गुंतवणूक; 27,510 रोजगाराच्या संधी

मुंबई, दि. १४ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासन तसेच ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात आज महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर.के. नारायणन यांच्यात हा करार स्वाक्षरीत झाला. यावेळी उपमुख्यंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन ॲडहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन ॲडव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते. हा सामंजस्य करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल




पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे. या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रात १० हून अधिक आधुनिक औद्योगिक व लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी ७९४.२ एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. यापैकी १.८५ कोटी चौ. फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल. या सर्व प्रकल्पांमध्ये मिळून एकूण थेट परकीय गुंतवणूक ही ₹५,१२७ कोटी आहे. या करारामुळे थेट व अप्रत्यक्ष अशी एकूण २७,५१० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे. हे लॉजिस्टिक्स पार्क्स नागपूर, भिवंडी, चाकण, सिन्नर, पनवेल यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी विकसित केले जाणार आहेत. हे प्रकल्प पर्यावरणस्नेही, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरयुक्त व रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणारे असून, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण २०२४ शी सुसंगत असेल. ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारी असून भारतातील उत्पादन, वेअरहाउसिंग व पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. 0000

# प्रियदर्शनी मुंडेचे दहावी परिक्षेत यश



बीड : प्रतिनिधी बीड येथील मुळ रहिवाशी व पुणे येथील पीआयसीटी मॉडेल स्कुलची विद्यार्थीनी प्रियदर्शनी महादेव मुंडे हीने दहावी परिक्षेत 98.80 टक्के गुण मिळवले आहेत. प्रियदर्शनी मुंडे विद्यालयातून तिसऱ्या क्रमांकावर आहे. तिच्या या यशाबद्दल शिक्षकवृंदांसह पालक, नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी महाराष्ट्राचे भूषण

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून शुभेच्छा

मुंबई, दि. १४ : भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आज शपथ घेतली हे महाराष्ट्रासाठी "भूषण" आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.आपल्या वडिलांकडून सामाजिक कार्याचा वसा घेतलेले न्या. भूषण गवई सर्वोच्च न्यायालयातील अनेक घटनात्मक खंडपीठांचा भाग होते. ज्याद्वारे अनेक चांगले ऐतिहासिक निकाल त्यांनी दिले आहेत. मुंबई



उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून न्या. गवई यांनी "महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ" नागपुरात स्थापन व्हावे यासाठी महत्त्वाचे योगदान दिले होते. विविध न्यायालयांमधील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठीही त्यांचे विशेष योगदान आहे.न्यायालयीन सेवेत आपल्या दीर्घ आणि निष्कलंक कार्यकाळात त्यांनी विविध उच्च पदांवर काम करताना न्याय, नीतिमत्ता आणि पारदर्शकतेचे भान राखले आहे. त्यांच्या कारकीर्दीत भारतीय न्यायव्यवस्था अधिक सुदृढ आणि लोकाभिमुख होईल, असा मला विश्वास आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

कडा (प्रतिनिधी) कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल या सी. बी. एस. ई. बोर्ड मान्यताप्राप्त शाळेचा १००% निकाल लागला असून शाळेतील प्रणव कासवा - ९५.४०% प्रथम क्रमांक , शर्विल भळगट - ९५.२०% द्वितीय क्रमांक, आयुष मुनोत - ९४.२०% तृतीय क्रमांक मिळवला आहे. त्याचबरोबर 13 विद्यार्थ्यांनी ८० % पेक्षा जास्त गुण संपादन करून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष- श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष - श्री. संदीपजी चानोदिया, सचिव - श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोदजी भळगट तसेच



संस्थेचे इतर पदाधिकारी श्री.मनीषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री. अमोलजी पटवा,श्री संजयजी पितळे, श्री.संतोषजी गांधी, मुख्याध्यापक - के. अभिलाष , सल्लागार - पी.जी. मेहेर सर , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले.

# हुतात्मा देवराव महाविद्यालयाची यशाची वाटचाल कायम सुरूच! टॉपर यादीत मुलांची आघाडी ; शाळेचा निकाल ९७.५३%

पाटोदा | प्रतिनिधी नवनिर्माण शिक्षण प्रसारक मंडळ, भायाळा संचलित हुतात्मा देवराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावी वर्गाचा निकाल यंदाही उत्कृष्ट आला असून गेल्या अनेक वर्षाची गुणवत्तेची परंपरा कायम राखण्यात यश आले आहे.शाळेतून प्रथम क्रमांक सागर आरसूळ (91.00) द्वितीय स्नेहल नागरगोजे (90.20) तृतीय नारायण वाघमारे (90.00) क्रमांक मिळवला आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या वतीने अधिकृत संकेतस्थळावरून आज मंगळवारी 1 वाजता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. हुतात्मा देवराव महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. सर्व शिक्षक वृंद यांनी अध्यापन कार्यातून परिश्रम घेतले.या उत्कृष्ट यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रगती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. रामकृष्ण बांगर साहेब, सचिव सौ. सत्यभामाताई बांगर, युवा नेते विजयसिंह बांगर, प्राचार्य दिनकर बांगर सर आदी सह



प्रथम : सागर आरसूळ (91.00%) द्वितीय : स्नेहल नागरगोजे (90.20%) तृतीय : नारायण वाघमारे (90.00%)

भायाळा येथील सर्व लोकप्रतिनिधी, शिक्षण प्रेमी, पालक शिक्षकइतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## शिक्षकांची मेहनत विद्यार्थ्यांची जिद्द यशस्वी

हुतात्मा माध्यमिक विद्यालयाने इयत्ता दहावी वर्गाच्या तासिका मार्च-२०२४ पासून सुरू करून उन्हाळी सुट्टीत जादा तासिका व जास्तीत जास्त सराव परीक्षा घेण्यावर भर दिला. स्टाफ मधील शिक्षक कर्मचारी यांनी मोठे परिश्रम घेतले.सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे अभिनंदन.

**- प्राचार्य दिनकर बांगर सर**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १५ मे २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## नरेंद्र मोदींचा करारी बाणा

पहिल्याच भाषणातून भारताचा करारी बाणा आणि योग्य वेळी संयम राखण्याची भूमिका नेमकेपणाने जगापुढे आली. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर पाकिस्तानशी लष्करी संघर्ष आणि अमेरिकेच्या पुढाकाराने त्याला स्थगिती या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत होत्या; तसेच विशेषत: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांवरून शंकाही उपस्थित करण्यात येत होत्या. मोदी यांच्या भाषणातून यांपैकी बहुतांश प्रश्नांना उत्तरे मिळाली आहेत. पाकिस्तानच्या पोकळ धमक्यांना भारताने लक्ष्याधारित हल्ल्यांद्वारे उत्तर दिलेच होते; पण योग्य वेळी सामोपचाराची भूमिकाही घेतली. त्यामुळेच संघर्षाची चाहूल लागल्यापासून ङ्गअण्वस्त्रधारी देशफम्हणून पाककडून आळविण्यात येत असलेल्या पालुपदाच्या पार्श्वभूमीवर मोदी यांच्या ङ्गअण्वस्त्रांना घाबरत नाही,फ या भूमिकेला कृतीचे बळ प्राप्त झाले. अमेरिकेच्या पुढाकाराबाबत काही बाबी देशवासीय आणि जगापुढेही स्पष्ट करणे आवश्यक होते. सोबतच अमेरिकेचा पुढाकार हा सध्याचा संघर्ष निवळण्यापुरताच असल्याचे सांगून पाकिस्तानशी चर्चेच्या शक्यतेबाबतही भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार गरजेचा होता. त्या पार्श्वभूमीवर काश्मीरप्रश्नी फक्त ङ्गपाकव्याप्त काश्मीरफ याच मुद्द्यावर चर्चा होऊ शकते, हेसुद्धा ठळकपणे जगापुढे आले. दहशतवादाच्या दुखण्यावर भारताने सिंधू करार स्थगितीपासून ते ङ्गऑपरेशन सिंदूरफ पर्यंत पावले उचलली आहेत. ही कारवाई करण्याची गरज का भासली, यावरही मोदी यांनी प्रकाश टाकला आणि यापुढील काळात दहशतवादी हल्ले हे युद्धच मानले जाईल, त्यामुळे दहशतवाद्यांचे भरणपोषण थांबवा, असा कडक इशाराही दिला. आता पाकिस्तान या घटनाक्रमातून काही धडा घेणार का, हे येत्या काळात स्पष्ट होईल. गेली काही दशके पाकपुरस्कृत दहशतवाद वारंवार डोके वर काढत आहे. त्या पार्श्वभूमीवर गेल्या काही काळात भारताने पाकिस्तानला जागतिक पातळीवर एकटे पाडण्यासाठी कूटनीती अवलंबिली; मात्र खुद्द पाकिस्तानला एक प्रकारे अनुल्लेखाने मारण्याचे एक अलिखित धोरणही दिसून येत होते. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या पाकिस्तानची आदळआपट सुरू झाली. भारताने एकीकडे घटनेतील कलम ३७० रद्द केल्याने काश्मीर प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या पाकच्या प्रयत्नांना आळा बसला होता. तसेच तेथे प्रचंड मतदानाद्वारे झालेल्या निवडणुकीतून लोकनियुक्त सरकारची स्थापना आणि पर्यटनाद्वारे आर्थिक विकासाला चालना, अशी पावले उचलण्यात येत होती. परिस्थिती सुरळीत होत असल्याचे हे चित्र धूसर करण्याचा प्रयत्न पहलगाम हल्ल्यातून झाला होता. त्याला लष्करी आणि कूटनीतीच्या मार्गाने दिलेल्या कडक उत्तराने भारत या संघर्षात चार पावले पुढ` राहिला आणि दहशतवादाला दयामाया नाही, हा संदेश दिलाच; सोबतच युद्ध हा कायमस्वरूपी उपाय नाही, हे लक्षात घेऊन शस्त्रसंधीला प्रतिसाद दिल्याने, भारत पाकिस्तानप्रमाणे युद्धखोर नसल्याचे पुन्हा अधोरेखित झाले. यामुळे भारताची प्रतिमा उजळून निघाली, हे यावर टीका करणाऱ्या शंकासुरांनी समजून घेतले पाहिजे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांना व्यापार थांबविण्याचा इशारा दिल्याचे म्हटले असले, तरी उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स आणि अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी व्यापाराचा मुद्दा उपस्थित झाला नसल्याचे म्हटले आहे. तसेच संभाव्य व्यापारयुद्धात अमेरिकेने चीनशी जुळवून घेतल्याने भविष्यात भारतालाही व्यापारसंधीच्या धोरणांवर विचार करून पावले टाकणे आवश्यक आहे. आजवर साथ दिलेल्या विरोधकांच्या मागणीप्रमाणे सरकार संसदेचे अधिवेशन घेणार काय, याबाबतही उत्सुकता आहे. काश्मीर आणि देशभरात सुरक्षाव्यवस्था बळकट करणे, हे तातडीचे उद्दिष्ट असून काही दिवसांत सुरू होणारी अमरनाथ यात्रा सुरळीत पार पाडणे, हे आव्हान आहे. देशांतर्गत भारतविरोधी दबावामुळे उसने अवसान आणल्याचे दिसले, तरी दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असलेल्या पाकिस्तानला हा संघर्ष वाढू देणे परवडणारे नव्हतेच. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीत पाकिस्तानला जाहीर झालेली मदत आणि शस्त्रसंधीसाठी अमेरिकेने घेतलेला पुढाकार यांचे धागेदोरे जुळतात काय, ही उत्सुकतेची बाब आहे. पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्था बनणे, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजनैतिक ताकद वाढवून महासत्तेकडे वाटचाल ही भारताची उद्दिष्टे आहेत

## किसान विद्यालयातून कु.उगवता सिरसाट प्रथम सूरज सिरसाट द्वितीय तर सचिन पवार तृतीय





नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील किसान विद्यालयाचा दहावीचा निकाल ८४ टक्के इतका लागला असून येथे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावी परीक्षेत कु.उगवता मुरलीधर सिरसाट हिने ८४.२० टक्के गुण घेऊन विद्यालयातून प्रथम क्रमांक सुरज साहेबराव सिरसाट याने ७७ टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तर सचिन मधुकर पवार याने ७५.४० टक्के आणि अतुल राठोड याने ७५ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. तर विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळाल्याबद्दल कु.उगवताचे सर्वत्र कौतुक होत आहे. कु.उगवता सिरसाट, सुरज सिरसाट, सचिन पवार, अतुल राठोड यांच्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव स्वप्निल उमरेकर मुख्याध्यापक श्री.पदमवार पि.व्ही सिरसाट, एम.एम.बच्चेवार,जी. टी.सिरसाट,आर एम शिंदे, ए.डी. शिंदे, बी.डब्ल्यू कदम ,शिवाजी तुंबरफळे,शादुल शेख विद्यार्थ्यांचे पालक रामराव पाटील सिरसाट, साहेबराव सिरसाट, यांच्यासह विद्यालयातील विषय शिक्षक विद्यार्थ्यांचे आई-वडील नातेवाईक यांनी शुभेच्छा देऊन कौतुक केले. तसेच सर्व स्तरांमधून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# नात्यातली सोयरीक

सोंगण्या टुपन्या आटोपल्या. रान शिवार ओस पडलं. ऊन्हाचा कहर वाढला. बक-या कोक-यावाले.गाई गुरं चारणारे. गुराखी आपापले गुराढोर बक-या कोक-यांचे कळप घेऊन रानोमाळ ढाक ऊन्हात हिंडत हिंडू लागले..बांधावरच्या वाळक्या गवतावर ही गुरे ढोरे बक-या कोक-या तोंडं आपटीत फिरत होते.खायला हिरवं कुठेच नव्हते. कुणी कुणी एखादा दर्दी गुराखी आपल्या जवळच्या लांब बांबूच्या कत्तीने उंच झाडाचा हिरवा झाडपाला कापून गुरा ढोरा, बक-या कोक-यांपुढं टाकत होता. तर गावात लोक उन्हाची घराच्या पडवीत.सपरात.मारुतीच्या मंदीरात. मंदीराच्या पुढे झाडाखाली पारावर डुळका घेत पडू लागली.ऊन्हाचा उकाडा वाढत होता.जमीन तव्यासारखी तापली होती.वा-याची कुठूनशी एवढीसी झुळूकही येत नव्हती.गरम झळया मात्र येत होत्या.

एवढ्या दुपारच्या कडक ऊन्हात राधू सखूला म्हणाला,''ह्ये पाह्य,मी धोंडू आण्णा कडून त्ये कपासी उपटायचं लाकूडं घीऊन येतू,उद्या सकाळच्याला कपाशीच्या पळ्हाट्या उपटायला लागतू. कशातरी चार आठ दिवसात पळ्हाट्या उपाटूनं हुन जाईन. मग नांगर टाकावा लागन म्हणलं''. तसी सखू म्हणाली, ''आवं भाईर ऊनं काय म्हणतयं त्ये दिसत नाय काय वं तुमास्नी ? ऊन्हं भाईर तोंड काढू देईना,कोनी कुत्र भाईर पडंना, तुमास्नी कसं कळत नाय वं ? लाकूडच आणायचय ना,मंग सांजच्याला जावा की त्येच्याकडं,आता उन्हाची समदे डुळका घ्येत पडले असतील नव्हं का वं. आन् नांगरच टाकायचा तर मंग पळ्हाट्या उपटायच्या तरी कशापायी वं ? चट नांगाटीत पडतील निघून.सरपन काडी वाल्या नेतील की येचूनसनी, दुनून कुटाना कशापायी करता वं,जरा ऊन्हांच पडा बरं.'' त्यावर राधू म्हणाला, ''आ ग धोंडू आण्णा कडून त्ये लाकूड कोनी बी घेऊन जात्यालं मंग ? लांबलं का आपलं काम ? आन् नांगरट झाल्यावर बी त पळ्हाट्या येचूनच काढावा लागत्याच ना.त्या परीस आतापसून उपटून घ्येतू रोज वजे,वजे,आन् फास घालून घरी घीऊन येतू.पाणकळ्यात कामं यितील ना. जळणाला.आजून पालकाट्या तोडायच्यात हैतं,त्या बी वाळत्याल. त्या बी जळणाला काम यीतील.पाणकळ्यात सरपण काडीची वण वण हुणार नाय ना तुपली.'' त्यावर सखू काय बोलणार. ती गप बसली. राधूनं तिला बोलायला जागाच ठेवली नाही.तरी पण ती बोललीच ''आ वं एवढं ऊन्हां तान्हाचं नगा जाऊत कोनाच्या घरी, सांजच्याला, थंड्या टायमाला जा म्या म्हणत्ये.आताच्याला ऊन्हाचं जरा आंग टाका बरं वाईच.'' तसा राधू म्हणाला,'' बरं बाई,टाकतूय आंग.'' असं म्हणून तिथंच लुंडाकला. लगेच घोरायला बी लागला.

संध्याकाळ झाली.जरा थंडवा पडला. गावात वर्दळ सुरु झाली. मारुतीच्या देवळापुढं दर्शनाला येणा-यांजाणा-यांची गर्दी जमली.राम राम,शाम शाम सुरु झाले. इकडल्या तिकडल्या गप्पा, टप्पा, हासी मजाक, मस्करी रंगू लागल्या,बिडी,काडी,तंबाखूची देवघेव होऊ लागली. खळ्याकडं जाणारे येणारे, राम राम,शाम करु लागले, खळ्यातले ढेपीचे खुराक पाणी आटपत आले.

राधूनं बी धोंडू आण्णा कडून पळ्हाट्या उपटायचं लाकूड आणून ठेवलं,सखून ढेपीचं टोपलं दिलं,टोपलं घेऊन तो वाडग्यात गेला. बैलांना ढेप देऊन चारा पाणी करुन घरी आला.

जेवण वेळ झाली होती.जेवणं खाणं करुन राधूने अंथरुणावर अंग टाकले,तर तिकडे सखू आणि मिना पडवीत पडल्या.मीनाला झोप लागली.सखू उठून राधू जवळ आली,आणि त्यांच्या कानी लागली.''आवं, म्या काय म्हणत्ये. डोळा लागला हुता व्हय वं''.सखू म्हणाली.तसा राधू म्हणाला,''नाय बा, काय त्ये ? बोल ना.''

आवं पोरीचं काही ध्येन येतयं का म्हणलं. तिच्या बरुबरीच्या पोरीचं लगीन हुन पाच पाच,सा,सा म्हैनं झाल्येत त्ये. पोरं तोंडानं म्हणल का वं ? तुमास्नी कळत कसं नायं वं. दिवाळी पसून मागं पुढं चाललंय त्ये लगनाचं. तुमी तुमच्या भैनीच्या भरुशावर बस्ल्यात,आन् तुमची भैन करतीय तुमास्नी दसरा दिवाळी कायी उन्हाळा.ह्या बोटांचं त्या बोटावर!आता त्यी तुमची भैन हायं म्हणा,पर मपल्यास्नी काय त्येंचा भरुसा दिसत नाय वं, तुम्ही काय बी म्हणा.आवं त्येंची पोरांची जात हाय त्यी,आपली पोर हाय पोर म्हणलं.त्येंनी आणखीन चार वर्सबी पोराचं लगीन नाय केलं तरी चालतंय वं,पर आपली लेकीची जात हाय वं.लोक लगीच कुचू कुचू कराया लागत्याल त्ये.

आन् करीत बी आसतीन.लोकं काय ?तोंडा म्होर गोड बोलत्यात आन् पाठम्होरी कुचानींदी करत्यात.नीस्ता देखण्या द्येवा दंडवत आसतुयं लोकांचा.जरा काम काम करणं बंद करा,आन् पहाटच्याला जा तुमच्या भैनीकडं,म्हणावं '' बाई आमास्नी गुतून ठिवलस,आमास्नी धडं दुसरीकडं पहाता बी येयीना.आन् तू बी लग्नाची तारीख पक्की करीनास.उद्याच्याला हा पाणकळा डोस्क्यावर आलायं.शेतीची कामं पडलीत म्हणावं.

''तसी ती पुढं म्हणाली, ''ऐकतावं का वं ? का झोप लागली तुमास्नी..? काय म्हणाव बाई या माणसांस्नी!मपल्याच जीवाचा आडघोळाणा नीस्ता.!!मपल्याच जीवाचा तरफडा हुतोयं नीस्ता.हा माणूस काय दगडावाणी काळजाचा हाय काय जणू बया...; तसंही ती उठून आपल्या आथूरणाकडं जाया निघाली,तोच राधू बोलला,''म्या ऐकतुयं समदं बरं का ? म्या काय भैरा नाय म्हणलं, मपल्यास्नी बी कळतंय म्हणलं बाईजी...,'' तो पुढचं काही बोलणार,

तेवढ्यात सखूनं त्याचं बोलणं मध्येच तोडत म्हणाली, '' तुमास्नी कळतंय ना, मंग काढा झोपा.पडूंद्या शेण तोंडात त्ये...;'' ती वैतागून,आस्ताळून पस्ताळून बोलत होती. तसी ती पुढं म्हणाली,''उद्याच्याला पहाटंच निघा त्या तुमच्या भैनीकडं,आन् ताबडतोब एक घाव दोन टुकडं करुन यावा.काडी मोड करुनच यावा. त्येस्नी सतरा, आपल्यास्नी आठरा.हितकी थूलू थूलू करायची काय बी गरज नायं.आलं एखादं थळ तर घीऊ धरुनसनी..

कुठूनसा कोंबडा ओरडण्याचा आवाज आला.सखू उठली.आडावरुन सरासरा चार पाच घागरी पाणी शेंदून आणून तिनं राजन भरुन घेतला.झाड झुड, सडा सारवण,आंघोळ पांघोळ केली. देवघर आवरुन देवपुजा केली. चुलीवरचे गरम पाणी मोरीत नेऊन ठेवले.थपा थपा दोन भाक -या थापल्या. लाल मिरचीचा गोळा पाट्यावर वाटून घ्येतला.तोवर राधू उठला.त्याने चुलीतून कोळसा घेतला. मोरीत गेला.मोरीतल्या दगडावर कोळसा घासून दात घासले. तोंड धुतले,आणि आंघोळ केली.

मोरीतून बाहेर आला.सखूनं त्याला कप बशीत चहा दिला.राधूने फुरक्या मारीत चहा घेतला. कप बसी बाजूला ठेवली. सखूनं फडक्यात दोन भाकरी आन् त्यावर लाल चटक मिरचीचा गोळा ठेवला.फडक्यात भाकरी बांधून पिशवित टाकून दिल्या. ''येतू म्या,'' म्हणत त्याने सखूचा निरोप घेतला. बाहेर खुंटीवरचे पागोटे डोक्यावर ठेवले.त्यावर उभारणे बांधले. पायात पायानं घातली.वाडग्यात आला.गाडी गळा घातली.पिशवी खुटल्याला अडकवली.गाडी वाडग्याच्या बाहेर घेतली. वाडग्याचं फाटक लाऊन घेतलं.पून्हा गाडीत बसला.बैलांना चुचकारले.बैल चालू लागले.गाडी ढळली.

राधू बहिणीच्या गावाला येसापूरला निघाला. तोवर चांगलंच फटाकलं होतं.ऊगवती उजळून दिसत होती. मावळतीला आजून सावळेपना दिसत होता.चारदोन चांदण्या अंधूक होत चालल्या होत्या. पाखरं घरट्यात खुडबूड करीत होती.दिवस निघायची वाट पहात होती. पायवाटा जाग्या झाल्या होत्या. मारुतीच्या देवळातील काकडा आरती थांबली होती.अस्पष्ट गजबजाट ऐकू येत होता.गार वारा सुटला होता. राधू आपल्याच तंद्रीत होता.गाडी रस्त्याच्या कडेला शांतपणे चालली होती.पिकं निघून, रान शिवारं मोकळी झाल्यामुळं रानं शिवराकडं येणारी वाट तुरळक वहात होती.राम राम, शाम शाम होत होता.कोणं गावाचं पाव्हणं,कुनकडं निघालं वगैरे जुजबी चौकशा होत होत्या.

इकडें सखूने मीनाला उठवीले. मीना उठली. वाडग्यात येऊन तिने झाड झुंड केली.गुरांची उगाळ उचलून उकिरड्यावर नेऊन टाकली. आडावरुन पाणी शेंदून आणले,आणि गाई वासरांना पाणी पाजले.बैलं तर गाडीला राधू सोबत गेले होते.नंतर शेण गोळा करुन त्यांच्या गोवऱ्या थापल्या, गाईची धार काढली.

वासराला दूध पाजून बाजूला बांधले.गाई वासरा पुढे चारा टाकून,दूध घेऊन घरी आली,आंघोळ करुन इतर घर कामात आईला मदत करु लागली.

रुकमण आणि राधू दोघं बहिणी भावंडं.रुकमण राधूंची मोठी बहिण होती.

रुकमण येसापूरच्या बाबुरावला दिलेली होती.येसापूरच्या शिवारात बाबुराव आणि रुकमणला पाच एकर मस्त काळपोटी जमीन होती. ही जमीन कोरडवाहू होती. दोघंही जमीनीत कष्ट करायचे.वरीस कडंला लागंल इतकं पिकायचं. त्यांना सदू नावाचा मुलगा होता.सदू अभ्यासात हुशार होता.गावची शाळा शिकून तो तालूक्याच्या शाळेत नंतर जिल्ह्याच्या शाळेत शिकला. पुढं शिकून एका मोठ्या कंपनीत मोठा साहेब झाला होता. त्याला नौकरीला लागून वर्ष झालं होतं.तेव्हा पासून त्यांच्या मागं लग्नाचा लकडा बाबूरावनं आणि रुकमणनं लावला होता.

रुकमनचा भाऊ राधू. या राधूला मीना नावाची एकुलती एक पोरं होती.देखणी होती.

दुसरी महालक्ष्मीच जसी. ''भावाची पोरं मीना लय गुणी,नाक नक्षी,बेस हायं, देखणी हायं. कामास्नी बी लय चपळ हायं.भावाची पोरं सून म्हणून घरात आली तर आपल्यास्नी जीव लावील. घर ठिवल्या ठिकाणी -हायीन.हातपाय थकल्यावर आज कालच्या सूना सासू सासरे साभाळायला कानकूस करत्यात. ही भावाची लेक हायं,आपटून झापटून का हुईना तिला आपल्यास्नी संभाळावाच लागलं.मायबापाचा दाप राहिन,आपलं त्ये आपलंच -हायीन ना. बरं भावाची पोरं नहीं केली तर भाऊ दुराऊन जाईन,जवळून जाईन पण बोलायचा नयी. जुनी वाट बुजून जाईन.'' असा विचार रुकमण करीत होती.म्हणून सदू नौकरीला लागल्या पासूनच ती भावाच्या न भावजयीच्या मागं लागली होती,''दादा वहिनी तुमची मीना मपल्या पोरास्नी द्या. दुसरी कडं नगा देऊत. आपली जुनी वाट चलती ठिवा.'' रुकमण म्हणत होती.आणि रुकमणच म्हणनं बी बाबुरावला पटतच होतं.तर राधूला आणि सखूला पण वाटायचं नव्या नात्यांच्या ठिकाणी काय खोडं निघंन त्ये सांगता येत नाही.काळजाचा तुकडा तोडून लोकांच्या हवाली करायचा,कोनी जीव लावतं कोनी नयी.आजकाल दुन्याचा भरुसाच -हायला नायी. लयं ढोरा गुरावाणी धरत्यात लोकांच्या लेकी बाळीला.तव्हा म्हणलं बरं भावाच्याच घरी लेक. हिथं पोरं सुकात तरी -हाईन. खाऊन पिऊन सुकी समाधानी तरी दिसंल लेकरु. जीवाला घोर -हाणार नायी.भावाला बोलता बी यीन.भाऊ बी जीव लावीन ना भासीला.''असं म्हणून राधून आणि सखूनं हुकार दिला होता. कसेही केलं तर नातं वाया जात नाही,असा दोघांनी विचार करुन राधूनं आणि सखूनं मीनाला भावाच्या घरी द्यायचं मनासी पक्कं केलं.

दिवाळी गेली.तुळसीचे लग्न लागले.अन लगीन सराई सुरु झाली. ज्यांनी ज्यांनी लग्न धरुन ठेवली होती. त्यांचे कार्य पार पडली.ज्याचे नवे सोयर संबंध जोडायचे होते.त्यांनी त्यांनी धावपळ करुन सोयर संबंध जोडून घेलले. लग्न कार्ये पार पाडली.राधू आणि सखू राधूच्या बहिणी कडून संदेसा येण्याची वाट पहात बसले.पण त्याला भैनीकडून ना निरोप आला ना सांगावा आला.''भैण मेहुण्याच्या मनात झोका झुलून गेला की काय जणू ?'' असे नको नको ते विचार राधूच्या मनात येऊ लागले.अशा विचारा विचारांतचं तो येसापुरात आला.

दुपार कलतीला लागली. ऊन्हानं जीवाची काहीली होत होती. वा-यानं पान हालत नव्हतं. पाखरं कुठे गडप झाली होती कोण जाणे. पडक्या घराच्या सावलीत कुत्रे पहुडले होते. आधून मधून गुरगुरत होते.गरम झळया सपासप लागत होत्या.जेवणं खाणं करुन लोकं कुठे,संपरात,कुठे पडवीत,कुठे निंबाच्या सावलीत, कुठे मारुतीच्या देवळात,कोणी कुठे सावलीचा आसरा धरुन तोंडावर उभारणे टाकून डोळे मिटून पडले होते.

कोणाला डुळका लागला होता.तर कोणी उगीचच डोळे मिटून पडले होते.

बाबुराव संपरात पोतं टाकून पडला होता. तोंडावर उपारणं घेतलं होतं.तर रुकमण उंब-यावर डोकं टेकून डोळे मिटून पडली होती. तिला झोप लागत नव्हती.पण डोळं मिटून तिही पडली होती.

कर्रर् कच् गाडीच्या चाकाचा एका एकी आवाज आला.तसे रुकमण ने डोळे खाडकन् उघडले.''एवढ्या उन्हात कशाचा आवाज आला आसंल बरं ?.'' म्हणून तिनं जरा कूस बदलली.आन् वट्याच्या खाली तिची नजर गेली.तसी ती खडबडून उठून बसली.आन् पाहू लागली.तिच्या डोळ्यांवर तिचाच भरवसा बसेना. ती ताड्कन् उठली आन् भर उन्हात वट्टयाच्या कडेवर येऊन ऊभी राहीली.तोवर राधूने गाडी वळवून पलीकडे अंगणात निंबाच्या झाडाखाली घेतली.कासरा फेकला खाली उतरला.बैलं, गाडी पासून वेगळे केले. गाडीच्या धु-या खाली ठेवल्या.बैल धु-याला बांधले.

गाडीतून कडब्याची पेंढी काढली. गुडघ्यावर ठेऊन मध्यभागी मोडली.आन् बैलांपुढे टाकली.

खुटल्याची पिशवी हातात घेतली.आणि तो मागे वट्टयावर चढण्यासाठी वळला. तोच ''दादा तू..? असा अवचित कसा रं.....? समदी बरी हायीत ना....?....'' रुक्मीणी म्हणाली.तोवर बाबुराव पण उठून उभे राहून तिथे आला,आणि म्हणाला, ''आ गं, आ गं ,जरा दम तर घे, त्येस्नी घरात तर येऊं देशील की नाय,का हिथंच हुभी राहूं देतीस त्येस्नी भाईर ऊन्हामंदी.....?''

राम, राम,शाम,शाम,झाला. राधू वट्ट्यावर आला.रुकमीणीनं त्यांच्या हातातून पिशवी घेतली.सगळे पडवीत आले.बाबुरावने पोतं पुढं सरकावलं राधू भिंतीला पाठ लाऊन बसला. तोवर राधाने घागरीतून तांब्यात पाणी आणलं. राधूनं पाणी घेऊन गुळण्या केला. आणि मुकळी फेकली.मुकळी पार वट्टयाच्या खाली गेली. तसी रुकमण म्हणाली, थोडं घोटभर पाणी पी बरं दादा,तू उन्हातून आला हैस.ऊन्हातून आल्या आल्या एकदम पाणी पिऊ नयी बरं''.

चहापाणी झाला.थोडा असाच टाईम गेला. अशाच इकडच्या तिकडच्या गप्पा गोष्टी झाल्या.गप्पा करता करताच राधू मूळ मूद्यांवर आला.तसं बाबुरावनं आणि रुकमणनं पण राधू का आला होता हे ताडलं होतं.पण त्यांचाही नाईलाज होता.आता खुलासा करुन सांगावाच लागणार होतं. सदा आल्यावर लगेच लगीन धरायचं होतं. ते दोघे पण सदाचीच वाट पहात होते. सदाला रुकमण ने आणि बाबुराव ने दोन पत्र धाडले होते.पण त्यांचा खुलासा की खुशाली येत नव्हती.

नौकरीवर गेल्यापासून एकदा की दोनदा त्याचं खूशालीचं पत्र आलं होतं.

त्यानंतर पत्रच नव्हतं.बाबुरावनं आणि रुमण नं त्याला पत्र पाठवलं होतं.''लग्नाचं पक्कं कराच आहे.एकदा येऊन जा ''म्हणून .पण त्याचं उत्तरच येत नव्हतं.आता भावाला सांगू तरी काय ? कसं ? असा रुकमीणी पुढं आणि बाबुराव पुढे पेच पडला होता. इकडे आड तिकडे हिर असा आडफासा त्यांना झाला होता. पावसा पाण्याचे दिवस डोक्यावर आले होते.हेही खरेच होते पण..

राधू लग्नाच्या विषयाला सुरुवात करणार तेवढ्यात बाहेरुन आवाज आला.''बाबुराव हैत का घरी...; म्या पोस्टमन हायं,ह्ये तुमचं टपाल घ्या.''पोष्टमन म्हणताच बाबुराव आणि रुकमण घाई घाई बाहेर आले.तसी रुकमण म्हणाली, ''या ना भाऊ आत,हितक्या ऊन्हात का हुभं -हाता ?'' त्यावर पोष्टमन म्हणाला, '' बसण्या इतका टाईम नायी ना ताई,आज लयी टपाल हायं वाटाया.'' त्यावर बाबुराव म्हणाला, ''भाऊ, तेवढं टपाल वाचुन दावा की,आमास्नी काय वाचता येत का. थोडा येळ या की वाईच सावलीत.'' पोष्टमनने विनंती ऐकली.तो आत आला. रुकमणनं त्याला बसायला दुसरं होतं टाकलं.आणि पाणी घेऊन आली.आणि म्हणाली,'' घ्या भाऊ पाणी.'' पोष्टमनने तांब्याचा तोंड न लावता वरुनच तांब्याचे तोंडात पाणी घेतले.तांब्या बाजूला ठेवला. रुकमण तांब्या घेऊन गेली.तांब्या मोरीत मिसळून फळीवर ठेऊन आली.आणि पत्राचे वाचन ऐकण्यासाठी येऊन बसली. तोवर पोष्टमनने पाकिट फोडले आणि वाचायला सुरुवात केली. सर्वजन जीव एकवटून ऐकू लागले....

'''तिर्थरुप आई बाबा,यांना साष्टांग दंडवत.आपले दोन पत्र आले. कामाच्या गर्दीमुळे पत्र लिहून पाठवायला वेळ मिळाला नाही.उशिर झाला खरं.माफ करा.मी खुशाल आहे. काळजी नसावी.

दुसरी आनंदाची गोष्ट असली की,माझी दुस-या देशात बदली झाली आहे. माझ्या सोबत याच देशातील एक मुलगी काम करते आहे. तिचे नाव ल्युसी आहे.तिचा स्वाभाव खूप गोड आहे. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात म्हणजेच दिवाळी नंतरच्या महिन्यात आम्ही इथल्या चर्च नावाच्या मंदीरात लग्न केले आहे. लवकरच ल्युसीला बाळ होणार आहे.मग आम्ही बाळ घेऊन विमानाने तुम्हाला भेटायला येऊत.काळजी करु नका.

आनंदात रहा.माझी काहीच काळजी करु नका.

ल्युसीच्या आई बाबांचे खूप मोठे शेत आहे.त्या शेतात खूप मोठे वेगवेगळी दोन घरे आहेत.एका घरात ल्युसीचे आई बाबा रहातात.

एका घरात मी आणि ल्युसी राहतो. जेवायला आम्ही सर्व एकत्रच येतो.ल्युसी आणि तिचे आई बाबा खूप दयाळू आणि चांगल्या स्वभावाचे आहेत.माझी खूप काळजी घेतात.

मला फार जीव लावतात.ल्युसी पण माझी खुप काळजी घेते.मला बाजारात पण एकटे जाऊ देत नाहीत.ल्युसीचे बाबा लगच गाडी काढतात.

आई बाबा या पत्रासोबत मी आमच्या लग्नाचे,आणि ल्युसीच्या,आई बाबांचे,आणि घरांचे शेताचे फोटो पाठवत आहे.मला खात्री आहे.तुम्हाला ते आवडतील. ल्युसी तर तुम्हाला नक्कीच आवडेल.ती नेहमी हासरी आहे.

असो.पत्र पुरे करतो.आम्हाला ल्युसीच्या आई बाबांसोबत त्यांच्या गाडीतून बाहेर जायचे आहे.पून्हा पत्र लिहीन. काळजी करु नका.

नमस्कार करतो. ल्युसीचा पण आपणा दोघांना नमस्कार.

तुमचाच.''

''सदू.''

पत्र वाचून दाखवून पोस्टमन टपाल वाटपासाठी निघून गेला.रुकमण आणि बाबुराव एकमेकांकडे निर्जीव बाहुल्यांसारखे पहात बसले.राधू तोंडात मारल्यासारखा शुन्यात पहात बसला होता.त्याची अवस्था धोबी का कुत्ता न घर का ना घाट का अशी झाली होती. ऊन्हं उतारणीला लागून,संध्याकाळ होत होती.राधू खाडकन् उठला.वट्टयाच्या खाली आला.बैल गाडीला जोडले.लगेच बैलांना चुचकारले.गाडी पांधीला लागली. अंधार पसरत चालला होता.

**तात्याराव पुंजाबा पवार.**
**औरंगाबाद.**
**मो.न-७७९८२८३०५५.**

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार १५ मे २०२५
https://lokaarambh.com



## प्रेमानेच द्वेषाला जिंकता येते -- सतीश गायकवाड



/प्रतिनिधी

दि. 12 : पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये थोर तत्वज्ञ आणि समाजसुधारक भगवान गौतम बुद्ध यांची 2567 वी जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केज येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश गायकवाड हे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी भुषविले. प्रारंभी जगाला प्रेम, अहिंसा, अपरिग्रह, त्याग आणि शांततेचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांचे प्रतिमापूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. द्वेष द्वेषाने नाहीसा होऊ शकत नाही तर द्वेषाने द्वेष वरचेवर वाढतो, प्रेमानेच द्वेष नष्ट केला जाऊ शकतो. प्रेमानेच प्रेम वाढते, हे एक नैसर्गिक सत्य आहे असे तत्वज्ञान महात्मा गोतम बुद्ध यांनी अवघ्या विश्वाला दिले असे प्रतिपादन प्रमुख मार्गदर्शक सतीश गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. विठ्ठल देखणे यांनी मानले तर कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन डॉ. उत्तम जाधव यांनी केले. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. गांधी बानायत, मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. विलास महाजन,प्रा. विनोद कांबळे, प्रा. सचिन कदम, प्रा. ज्ञानेश्वर बेटुळे, प्रतिक देशमुख, उपस्थित होते.

# दहावी परीक्षेत मानोरा तालुक्याचा निकाल 94.86 टक्के



दै. प्रजाशासन न्यूज / प्रतिनिधी मंगेश खाडे मानोरा: माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे वतीने घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल दि 13 मे रोजी जाहीर करण्यात आला त्यात तालुक्याचा निकाल ९४.८६ टक्के लागला आहे २१८९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती एकूण २१६४ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली त्यापैकी २०४९ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. यशवंतराव चव्हाण विद्यालय वार्ड गिरडा १०० टक्के, गजाधर राठोड आश्रम शाळा इंगलवाडी ९८.५२ टक्के,वसंतराव नाईक विद्यालय पाळोदी धोनी ९४.४४ टक्के, आप्पास्वामी विद्यालय शेंददुरजना आढाव ९८.१४ टक्के,मातोश्री शेवंताबाई आश्रम शाळा विळेगाव १०० टक्के,श्री अंबिका विद्यालय गव्हा ९३.२४ टक्के श्री किसनराव हायस्कूल पोहरादेवी ९४.०५ टक्के, जय बजरंग विद्यालय भुली ९४.१२ टक्के,जिह्ला परिषद वसंतराव नाईक विद्यालय विठोली ९७.१४ टक्के,वसंतराव नाईक विद्यालय उमरी बू ८४.४४ टक्के, स्वर्गीय लक्ष्मणराव देशमुख विद्यालय कारखेडा १०० टक्के, वसंतराव नाईक विद्यालय वरोली ९७.८७ टक्के, वसंतराव नाईक बेसिक आश्रम शाळा फुलउमरी ८८.४६ टक्के, तपस्वी काशिनाथ बाबा स्कूल अमरगड ८१.६० टक्के, श्रीमती काशीबाई विद्यालय सोयजना ८७.५० टक्के, समता विद्यालय कुपटा ८८.५७ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय मानोरा ९५.६८ टक्के, एल एस पी एम हायस्कूल धामणी मानोरा ९७.७२ टक्के, राष्ट्रमाता इंदिरा गांधी कन्या विद्यालय मानोरा ९५.५३ टक्के, रहेमानिया उर्दू हायस्कूल मानोरा ९७.५० टक्के, सुलेमानिया उर्दू हायस्कूल मानोरा ९५ टक्के, श्री मुंगसाजी महाराज हायस्कूल इंझोरी ९५.४५ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय भोयनी ५० टक्के, वसंतराव नाईक स्कूल दापुरा ८२.२२ टक्के, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय म्हसनी ६६.६६ टक्के, श्री भगवंतराव विद्यालय गिरोली ९६.४२ टक्के, श्री बाबनाजी महाराज हायस्कूल कोंडोली ९५.६५ टक्के, वसंतराव नाईक विद्यालय साखरडोह १०० टक्के, वामन महाराज कन्या विद्यालय कोलार १०० टक्के,श्री गजानन महाराज विद्यालय हिवरा बु ९५.२३ टक्के, श्री माधवराव पाटील विद्यालय कारली ९८.४१ टक्के, जगदंबा माध्यमिक शाळा मोहगव्हाण पारवा १०० टक्के, श्री सोमनाथ विद्यालय आसोला खुर्द ९१.९३ टक्के, प्रशिक विद्यालय धावंडा १०० टक्के, वाघा माय आदिवासी माध्यमिक विद्यालय रुई गोस्ता ९८.६८ टक्के, मुंगसाजी महाराज आश्रम शाळा शिवनी ८७.५० टक्के तारीक अन्वर उर्दू हायस्कूल गिरोली १०० टक्के, रहमानिया उर्दू हायस्कूल कुपटा ९५ टक्के, लोकहित माध्यमिक शाळा मानोरा १०० टक्के, प्रशिक माध्यमिक विद्यालय राहुल पार्क मानोरा ८८.८८ टक्के, संत वामन महाराज इंग्लिश धामणी मानोरा १०० टक्के, चिंतामणी प्रायमरी इंग्लिश स्कूल मानोरा ९४.६८ टक्के, असा निकाल लागला आहे डिस्टिक्शन उत्तीर्ण मध्ये ७१९ ए ग्रेड मध्ये ८३२, बी ग्रेड मध्ये ४१८, व पास ग्रेड मध्ये ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत ४१ पैकी १० शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे

# शेतक-यांनी केवळ डिएपी वरच अवलंबून न राहता पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन

बीड दि. 14 : - महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी असून डिएपी (Di-Ammonium Phosphate) खता मध्ये 18 ट्क्के नत्र तर 46 टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत यासाठी शेतक-यांनी डिएपी खते वापरावीत. डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डी ए पी खतानंतर एस एस पी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-16 ट्क्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-10:26:26, एनपीके-20:20:0:13, एनपीके-12:32:16 व एनपीके-15:15:15 या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टिएसपी (Tripple Super Phosphate) या खता मध्ये 46 टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरिप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## एस पी बाकलीवाल विद्यालय थेरगाव या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल 90.47 टक्के


/प्रतिनिधी



एस पी बाकलीवाल विद्यालयामध्ये इयत्ता दहावी परीक्षेस एकूण 63 विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. यामधून 57 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यसह 24 विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत 24 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. कु.निर्मळ कल्याणी संजय 90.00 प्रथम, कु. निर्मळ वैष्णवी अंगद 88.20 द्वितीय तर कु. गोलांडे श्रावणी कैलास 86.40 व गोजरे वैष्णवी बापूसाहेब 86.40 गुण मिळवून तृतीय आले आहे. सर्व उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे माजी मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष श्री. अनिल पटेल, उपाध्यक्ष श्री. सुभाष पटेल, सचिव श्रीमती. रंजना पाटीदार, संचालक श्री.निमेश पटेल, मुख्याध्यापक श्री. सुरेश पाटील, श्री. मनोहर घायाळ आदींनी अभिनंदन केले.

## 10वी नंतर काय? विद्यार्थ्यांसाठी करिअर निवडताना मार्गदर्शक!

मुंबई, दि. 14 मे: 10वीच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांसमोर अनेक शैक्षणिक आणि व्यावसायिक पर्याय खुले होतात. योग्य माहितीअभावी अनेक वेळा विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होतो. अशा वेळी एक मार्गदर्शक चार्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील दिशा ठरवण्यासाठी उपयुक्त ठरतो. 10वी नंतर तीन मुख्य शाखा निवडता येतात: सायन्स, आर्ट्स आणि कॉमर्स. प्रत्येक शाखेतून पुढे जाऊन विद्यार्थी इंजिनीयरिंग, वैद्यकीय, व्यवस्थापन, पत्रकारिता, संरक्षण सेवा, शिक्षक, वकिली, शेती, संगणक शास्त्र अशा विविध क्षेत्रांमध्ये करीअर करू शकतात. उदाहरणार्थ, सायन्स शाखेतून




एमबीबीएस, इंजिनीयरिंग, फार्मसी, ॲग्रीकल्चर यांसारखे पर्याय उपलब्ध होतात. कॉमर्स शाखेतून CA, CS, B.Com, M.B.A. पर्यंतची वाटचाल करता येते. आर्ट्स शाखेतून B.A., M.A., पत्रकारिता, लॉ, सामाजिक कार्य अशा क्षेत्रात संधी मिळतात. तसेच, 10वी नंतर डिप्लोमा कोर्सेस, आयटीआय, पोलिस भरती, लष्कर-नेव्ही भरती, विमानतळ सेवा, बँकिंग परीक्षा, रेल्वे नोकरी अशा अनेक शासकीय व खासगी क्षेत्रांमध्ये थेट प्रवेश घेता येतो. पालक व विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडी, क्षमतानुसार योग्य क्षेत्र निवडावे व योग्य मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. चुकीची निवड भविष्यातील संधींवर परिणाम करू शकते.

# तहसीलदारावरील हल्ल्याचा निषेध करत आरोपींना अटक होईल पर्यंत आंदोलन..महसुल संघटनेकडून निवेदन

/प्रतिनिधी

अंबड तालुक्यामध्ये गौण खनिज अवैध उत्खनन व वाहतुक प्रतिबंधक पथकावर वाळू माफीयाकडून सशस्त्र हल्ले होत आहेत. दि. 11/05/2025 रोजी शहागड येथील नदीवर असलेल्या पुलाखालुन रेतीचे अवैध उत्खनन व चोरटी वाहतुक होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यावरून तहसीलदार अंबड स्वतः पथकासह खाजगी वाहनातुन त्यांचा प्रतिबंध करण्यासाठी गेले असता नदीमध्ये असलेल्या ४ टॅक्ट्रचे चालक व मालक व इतर लोकांनी पथकास व तहसिलदार अंबड यांना अटकाव करून जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर व पथकातील इतर महसुल कर्मचाऱ्याच्या



अंगावर टॅक्ट्रर घालण्याचा प्रयत्न केला तसेच ते शक्य न झाल्याने व मा. तहसिलदार अंबड हे स्वतः सामोरे झाल्याने त्यांच्यावर जिवघेणा हल्ला केला त्यामध्ये गाडिचा ड्रायव्हर यास मार लागला असुन तहसिलदार अंबड यांनी प्रसंगावधान दाखवुन त्यांच्याकडे असलेल्या बंदुकीमधुन चार राउंड फायर केल्याने पुढील अनर्थ टळला. बंदुक व ते चालवण्याचे धारीष्ट तहसीलदार यांनी दाखवल्याने घाबरून जावुन सर्व हल्लेखोरांनी पळ काढला. स्वतः मा. तहसिलदार अंबड यांच्यावरच जिवघेणा हल्ला झाल्यामुळे त्यांच्यासोबतच्या व अंबड तहसिल कार्यालयातंर्गत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये एक प्रकारची भीती निर्माण होवून दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदरील वाहन चालक व मालक तसेच इतर लोकांच्या नावे गोंदी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करूनही अद्यापही आरोपी यांना अटक करण्यात आलेली नाही. ह्या भ्याड हल्याचा महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संघ शाखा अंबडच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून तीन दिवसांच्या आत आरोपींना अटक झाली नाही तर जोपर्यंत आरोपींना अटक होणार नाही तोपर्यंत नैसर्गिक आपत्ती व निवडणुकीचे कामे वगळता निवडणुकीचे कामे वगळता इतर सर्व कामकाजावर बहिष्कार टाकून काम बंद आंदोलन करण्यात येईल व यापुढे ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी गौण खनिज अवैध वाहतुक प्रतिबंधक पथकात दोन शस्त्रधारी पोलीस कर्मचारी यांचे संरक्षण व शासकीय वाहन असल्याशिवाय कार्यवाहीसाठी जाणार नाहीत. असे निवेदनात नमूद केले आहे.निवेदनावर महसूल संघटनेच्या पदाधिकारी, मंडळ अधिकारी ,तलाठी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# प्रवास सौख्याचा या गीताचा लोकार्पण सोहळा संपन्न

प्रतिनिधी- जगदीप वनशिव

पुणे - येथील ज्ञानाई फाऊंडेशन संस्थेच्या वतीने गीतकार सिने अभिनेते लोककवी सीताराम नरके लिखित गीताचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी हास्यसम्राट बंडा जोशी प्रा . सूर्यकांत नामगुडे सिनेनिर्माता रामदास राऊत डॉ चारुदत नरके मच्छिद्र नरके सौ विजयाताई सीताराम नरके चंद्रकांत झगडे ( माजी पोलीस अधिकारी ) प्रा . हनुमंत तोडकर सामाजिक कार्यकर्ते मधुकर कुदळे एस जी फिल्मचे राहुल जाधव ग्रामीण कवी चंद्रकांत जोगदंड सूर्यकांत नामुगडे कृषीउद्योजक कवी किशोर टिळेकर कृषीसेवक विठ्ठल भुजबळ विठुलदादा गायकवाड या मान्यवरांच्या उपस्थितीत



गीतांचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला या प्रसंगी एस जी फिल्म प्रोडक्शन सूर पुराणे आवाज नयी या मराठी हिंदी गीताचा सुमधुर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता महाराष्ट्रातील मान्यवर कवीराज विजय सातपुते गझलकार अशोक भांबुरे कवी गीतकार पांडुरंग म्हस्के (चांडाळ चौकडी कलाकार ) आनंद गायकवाड (गायकवाडी गायक कवी ) अशोक गायकवाड दशरथ दुनघव प्रा शरयू पवार सौरभ जाधव शारदा जाधव मधुकर पाटेकर माधुरी नरके रागिणी श्रीकांत कुदळे वंसुधरा अनिल होले मानसी पाटेकर जयश्री गटलवार सुनिल बोराडे के लक्ष्मण सुरेंद्र राव धिवार ( चक्के मामा ) गायत्री नरके हरित नरके कजरी मासिकाच्या संपादिका श्रीमती अलकाताई भुजबळ अनुराधाताई पांढरे प्रा रंजना प्रकाश इंगळे पोसई सुनील भापकर सुनंदाताई कुदळे सुप्रसिध्द व्यापारी सचिन सुधाकर वाडकर संतोष दत्तात्रय वाडकर सामाजिक कार्यकर्ते अमोलशेठ दुगाणे दिनेश नामदेव होले - (सदस्य - मध्य रेल्वे सल्लागार समिती भारत सरकार अध्यक्ष - स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान )अहिरे मॅडम पो हवा बंदुके मुंबई सौ .मीनाताई कोद्रे उद्योजक सतिष नरके माधुरी नरके इंजिनियर श्रीकांत कुदळे वसुंधर होले रागिनी कुदळे हे उपस्थित होते

# गोखले बी.एड. चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ




परळ येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च महाविद्यालयाचा नुकताच वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संस्थेच्या अध्यक्ष मा. सौ. सुहासिनी संत यांच्या हस्ते संपन्न झाला. सदर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मागील शैक्षणिक वर्षांमधील झालेल्या विविध स्पर्धा, खेळ, उपक्रम आणि सादरीकरण यामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. समारंभाच्या सुरुवातीस प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी मागील शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर केला. प्रा. डॉ. प्रशांत काळे व श्री. काशिनाथ चौरे या दोघांना महाविद्यालयातील प्रदीर्घ सेवेबद्दल अध्यक्ष डॉ. संत यांनी सन्मानित केले. यावेळी महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक "नवांकुर" याचे प्रकाशन सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संगीता पाटकर यांनी केले तर कार्यक्रमाचे नियोजन डॉ. संदीप बोडके, श्री मनोहर काळे, कु. सिद्धी आंबडसकर आणि श्री. सदाशिव भोसले यांनी केले.

## कर्जतच्या राजुरेश्वरची निकालाची परंपरा कायम...










प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळाच्या वतीने लागलेल्या इयत्ता १० वीच्या निकालात अंबड तालुक्यातील कर्जत येथील राजुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची यशस्वी निकालाची परंपरा कायम राखत ९७.५९ टक्के लागला आहे.एकुणु ८३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १० विशेष प्राविण्यसह ,३७ प्रथम श्रेणीत,तर २४ व्दितीय क्षेणीत तर १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

विद्यालयातुन प्रथम पवन उद्धव कचरे (88.60%), द्वितीय कु. स्वाती रामकिसन बारवाल(85.40%),तर तृतीय अमृता अशोक गाडेकर (83.40%) हीने पटकावला आहे.तर उत्तेजणार्थ आदित्य रमेश डोंगरे(82.20%), चैतन्या गणेश बोरुडे (80.60%), प्रीती किशोर काळुंके(80.20%) उत्तीर्ण झाले आहे.

यशस्वी विद्यार्थांचे पांडुरंग तात्या डोंगरे, सचिव डॉ.राहुल पाटील डोंगरे (भैय्या), प्राचार्य विलास टकले,सर्व प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकांनी अभिनंदन केले आहे.

# हा तर क्लिअर कट भारताचाच विजय; जगातील दोन मोठ्या मिलिट्री एक्सपर्टकडून शिक्कामोर्तब


ऑपरेशन सिंदूर नंतर चवताळलेल्या पाकिस्तानने खोट्या गोष्टी पसरवण्यास सुरुवात केली आहे. खोटी माहिती देऊन दिशाभूल करण्याचं काम सुरू आहे. मात्र, ऑस्ट्रेलियन मिलट्री एक्सपर्ट टॉम कूपर आणि अमेरिकेचे युद्ध तज्ज्ञ जॉन स्पेन्सर यांनी पाकिस्तानच्या शहबाज शरीफ सरकारचा बुरखा फाडला आहे. या दोन्ही मिलिट्री तज्ज्ञांनी गेल्या तीन चार दिवस चाललेल्या लढाईत भारताचाच विजय झाल्याचा दावा केला आहे. पाकिस्तानने शस्त्रसंधीसाठी भारताला केविलवाणेपणे साकडं घातलं. त्यात काही नवीन नव्हतं. कारण पाकिस्तानचं एवढं नुकसान झालं होतं की त्यामुळे पाकिस्तान घाबरला होता. त्यामुळेच शस्त्रसंधी करण्याशिवाय पाककडे पर्याय उरला नव्हता, असं या दोन्ही तज्ज्ञांनी म्हटलं आहे. टॉम कूपर हे जगातील सर्वात सन्मानिय युद्ध विशेषज्ञ आहेत. युद्ध इतिहासकार आहेत. कूपर हे विश्लेषक, लेखक आणि मध्यपूर्व पासून ते दक्षिण आशियापर्यंतच्या एअर वॉरचे एक्सपर्ट आहेत. 6 आणि 7 मे दरम्यान रात्री पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे अड्डे उद्धस्त केल्यानंतर पाकिस्ताने भारताच्या अनेक सैन्य ठिकाण्यांवर हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. भारताने त्यांच्या कारवाईचं जशास तसे उत्तर दिलं. एक आठवडा चाललेल्या या घटनाक्रमावर टॉप कूपर यांनी एक ब्लॉग लिहिला आहे. आर्मी टिकलीच नाही टॉम कूपर म्हणतात, भारतीय सैन्याच्या समोर पाकिस्तानी आर्मी टिकू शकली नाही. भारताने पाकिस्तानच्या आत घुसून ज्या पद्धतीने हाहा:कार माजवला, त्यातून पाकिस्तान पराभूत झाल्याचं दिसून येत



आहे. त्यामुळेच सीजफायर व्हावी म्हणून पाकिस्तानने अमेरिकेला साकडे घातले, असं सांगतानाच भारताची हा क्लिअर कट विजय असल्याचं कूपर यांनी म्हटलं आहे. हा सरळ सरळ विजय सरळ सरळ सांगतो, जसं नेहमी सांगतो. एक देश दुसऱ्या देशाच्या अण्वस्त्र भंडारावर बॉम्ब फोडत असेल आणि दुसरा देश काहीच करण्याच्या स्थितीत नसेल तर माझ्या मते हा सरळ सरळ विजय आहे. इस्लामाबादकडून सीजफायरसाठी साकडं घालणं ही काही नवीन गोष्ट नाहीये, असं कूपर ब्लॉगमध्ये म्हणतात. पाकिस्तानने मौन पाळलं भारताची कारवाई पाकिस्तानपेक्षा किती तरी मोठी होती. यात भारताचा थेट विजय झाला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कमीत कमी पाच मुख्य अतिरेकी मारल्या गेले. तसेच इतर 140 अतिरेक्यांना कंठस्नान घालण्यात आलं. यावर पाकिस्तानच्या सरकारने मौन बाळगलं आहे. पण आयएसआयने या अतिरेक्यांना शहीद ठरवून त्यांना पाकिस्तानी सैन्याच्या अधिकारांसोबत राजकीय सन्मान दिला आहे. यावरून अतिरेक्यांचा पाक सैन्याशी थेट संबंध असल्याचं स्पष्ट होतं, असं त्यांनी म्हटलंय. पाकिस्तान फेल गेला पहलगामवरील हल्ल्याचा बदला घेण्याची भारताची कारवाई यशस्वी ठरली आहे. पाकिस्तान फेल गेला आहे. भारताने केवळ अतिरेकी कॅम्पावर हल्ला केला नाही, तर पाकिस्तानचे हल्ले कुशलतेने परतवून लावले आहेत. पाकिस्तानचे हल्ले भारताची एअर डिफेन्स सिस्टिम एस-400, बराक, आकाश, स्पायडर आणि बोफोर्सला पार करू शकले नाहीत, असंही त्यांनी नमूद केलंय. धमक्या गंभीरपणे घेणं सोडलं इंड्स वॉटर ट्रीटी सस्पेन्शनमध्ये टॉम कूपर म्हणतात, भारताने पाणी रोखलं. पाकिस्तान काहीच करू शकला नाही. खरं तर पाकिस्तानसाठी ही रेड लाईन होती. पाकिस्तानने काहीच धडा घेतला नाही. भारताने पाकिस्तानच्या धमक्या गंभीरपणे घ्यायचं सोडून दिलंय हे पाकलाही कळलं नाही.

## भारताने फक्त तीन दिवसात पाकड्यांना लोळवलं, यात रशियाचा मोठा फायदा

युद्ध हे कुठल्यात समस्येच उत्तर नाही. पण काहीवेळा दीर्घकालीन शांततेसाठी युद्ध लढावं लागतं. युद्धामध्ये वित्तहानीबरोबर जिवीतहानी सुद्धा आहे. युद्ध लढणाऱ्या दोन्ही बाजूंच्या सैनिकांबरोबर अनेक निरपराध मारले जातात. त्यामुळे युद्धाचा कधीच समर्थन होऊ शकत नाही. युद्धादरम्यान एकाबाजूला मानवी जीवनाच कधीच न भरुन येणारं नुकसान होतं. त्याचवेळी दुसऱ्याबाजूला व्यापार सुद्धा चालतो. युद्ध म्हणजे शौर्य, रणनिती आणि शस्त्र चालवण्याच कौशल्य. युद्धा दरम्यान कुठल्याही देशाकडून ताकत दाखवताना शस्त्रास्त्र प्रदर्शन होतं. जसं की भारताने पाकिस्तान सोबतच्या तीन



दिवसाच्या लढाईत आपलं कौशल्य, क्षमता दाखवली. भारताने अवघ्या तीन दिवसात पाकिस्तानला लोळवलं. पाकिस्तानची युद्ध लढण्याची जी खुमखुमी होती ती सर्व उतरवली. पाकिस्तानने विचारही केला नव्हता असा हवाई हल्ला पाकिस्तानवर चढवला. पाकिस्तानचे अनेक हवाई तळ उडवून दिले. भारताने 7 मे रोजी पाकिस्तानात दहशतवाद्यांच्या तळावर एअर स्ट्राइक केले. त्यानंतर पाकिस्तानने पूर्ण तयारीनिशी भारतावर प्रतिहल्ला चढवला. एकाचवेळी शेकडो ड्रोन्स, मिसाइल्स डागले. पण एखाद-दुसरा अपवाद वगळता पाकिस्तानी ड्रोन्स, मिसाइल्स हवेतच नष्ट झाली. भारताने यातून आपलं आधुनिक युद्ध कौशल्य दाखवून दिलं. फायदा कसा? भारताने पाकिस्तान विरोधात मोठा विजय मिळवला. पण यात सर्वात जास्त फायदा रशियाचा होणार आहे. कारण पाकिस्तानचे दोन मोठे हवाई हल्ले भारताने यशस्वीरित्या परतवून लावले, त्यात रशियाच्या S-400 आणि भारताच्या आकाश एअर डिफेन्स सिस्टिमने निर्णायक भूमिका बजावली. या दोन्ही शस्त्रांनी पाकिस्तानचे सगळे मनसुबे धुळीस मिळवले. महत्त्वाच म्हणजे हे सर्व लाइव्ह कॅमेऱ्यासमोर जगाने पाहिलं. S-400 आणि आकाशने आपलं नाण खणखणीत वाजवून दाखवलं. त्यामुळे भविष्यात जगभरातून S-400 आणि आकाश या दोन एअर डिफेन्स सिस्टिमची मागणी वाढणार आहे. S-400 ही एअर डिफेन्स सिस्टिम खूप महाग आहे. भारताने काही हजार कोटी रुपये खर्चून रशियाकडून ही हवाई सुरक्षा प्रणाली विकत घेतली होती. आज तीच निर्णायक ठरली आहे

## मराठा सेवा संघाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड येथील यशवंतराव चव्हाण मराठा विद्यार्थी वसतीगृह येथे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची ३६८ वी जयंती साजरी करण्यात आली.प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार सोपानराव शिरसागर विभागीय अध्यक्ष इंजि.शेरा पाटील मराठा सेवा संघाचे जिह्लाध्यक्ष अँड.सतीशकुमार जाधव ,पंडितराव कदम, नानाराव कल्याणकर जिजाऊ ब्रिगेडच्या जिह्लाध्यक्षा सुमित्राताई वडजकर सचिव वनिताताई देवसरकर,मारोती देशमुख यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## आर जे एम डी शाळेचा १०० टक्के निकाल

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी रत्नागिरी जिह्ला मराठा ज्ञाति समाज मुंबई संचलित बालविकास विद्या मंदिर जोगेश्वरी पूर्व शाळेचा शालांत परीक्षेचा निकाल १०० % लागला असून कुमारी अश्मि महेश सावंत हीने ९७.६०% मार्क्स मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे आणि तिची बहीण कुमारी निधी सावंत हिने ९६% मार्क्स मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला तर कुमारी श्रेया संतोष सुतार हिने ९५% मार्क्स मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल जोगेश्वरी चा निकाल दरवर्षी प्रमाणेच १००% लागला असून कुमार प्रसाद प्रकाश नारकर याने ९६.६०% मार्क्स मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. कुमारी श्रावणी कदम हीने ९३% मार्क्स मिळवून द्वितीय क्रमांक तर कुमारी वैष्णवी धोबी हीने ९२.८०% मार्क्स मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. गुणवंत यशस्वी विद्यार्थी, दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व पालकांचे संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. सहदेव सावंत, उपकार्याध्यक्ष श्री अशोक परब, सरचिटणीस श्री. जितेंद्र पवार, चिटणीस सौ.सुरक्षा घोसाळकर, चिटणीस व शालेय प्रशासकीय समितीचे अधिकारी श्री यशवंत साटम, सहखजिनदार श्री विजय खामकर व का. सदस्या सौ. इंद्रायणी सावंत यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## अखेर पाकिस्तानला BSF जवानाला सोडावं लागलं

SF जवान पूर्णब कुमार शॉ पाकिस्तानातून परतले आहेत. भारताने सुद्धा पूर्णब कुमार शॉ यांच्या बदल्यात पाकिस्तानी रेंजर्सना परत पाठवलय. जवान पीके साहू यांना पाकिस्तानने भारताकडे सोपवलय. ते अटारी बॉर्डरवरुन परत आले आहेत. बीएसएफ जवान चुकून पाकिस्तानच्या हद्दीत गेला होता. त्यानंतर भारताने सुद्धा पाकिस्तानी रेंजर्सच्या एका सैनिकाला पकडलं होतं. आता दोन्ही देशांनी जवान आणि रेंजर्सच एक्सेंज केलं आहे. जवान आणि रेंजर्सची एक्सेंज करण्याची प्रक्रिया सकाळी 10.30 वाजता अटारीमध्ये झाली. बीएसएफकडून जवान भारतात परतल्याची माहिती देण्यात आली आहे. आज बीएसएफ जवान पीके शॉ परत आले. 23 एप्रिल 2025 पासून ते पाकिस्तानी रेंजर्सच्या ताब्यात होते. पीके शॉ यांना 10.30 वाजण्याच्या सुमारास संयुक्त चेक पोस्ट अटारीवरुन भारताकडे सोपवण्यात आलं. हँडओव्हर शांततापूर्ण आणि प्रोटोकॉलनुसार झाल्याच बीएसएफकडून प्रेस रिलीजमध्ये सांगण्यात आलय. पाकिस्तानी रेंजरला कुठे पकडलेलं? सध्या भारत-पाकिस्तानमध्ये प्रचंड तणाव



आहे. दोन्ही देशांकडून मिसाइल आणि ड्रोनद्वारे परस्परांवर हल्ले करण्यात आले. भारताने पाकिस्तानला दहशतवादाविरोधात सडेतोड प्रत्युत्तर दिलं आहे. आता दोन्ही देशांमध्ये सीजफायर झालं आहे. सीजफायरनंतर 14 मे रोजी बीएसएफ आणि पाकिस्तानी रेंजर्सनी आपपाल्या भागात पकडलेल्या जवानांना शांततामय मार्गाने परस्परांना परत केलय. फिरोजपूर येथे पाकिस्तान सीमेजवळ पाक रेंजर्सनी भारताच्या जवानाला अटक केली होती. दुसरीकडे बीएसएफने राजस्थानात भारतीय सीमेजवळ पाकिस्तानी रेंजरला पकडलं होतं. जवानाच्या बदल्यात भारताने सुद्धा पाक रेंजरला पाकिस्तानला सोपवलं आहे. सीमेत घुसण्याचा प्रयत्न राजस्थानच्या श्रीगंगानगर येथे भारत-पाकिस्तान इंटरनॅशनल बॉर्डरवर बीएसएफने एका पाकिस्तानी रेंजरला अटक केली होती. पाक रेंजर बॉर्डर क्रॉस करुन भारतीय सीमेत

## छत्रपती संभाजीराजेंच्या स्मारकासह महापुरुषांचे पुतळे उभारण्याबाबत अनास्था ; ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करुनही जिल्हा परिषदेतील काम रखडले; छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी धरणे आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- जिह्ला परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराजांसह विविध महापुरुषांचे पुतळे उभारणीबाबत १५ वर्षांपूर्वी जिह्ला परिषदेचा ठराव झाला. यासाठी आंदोलने आणि उपोषणेही झाली. नवीन इमारतीच्या आवारात छत्रपती संभाजीराजांचे स्मारक आणि इतर राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्याची घोषणा जिह्ला परिषदेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी केली. विशेष म्हणजे तत्कालीन पालकमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांनी १९ मार्च २०२२ रोजी पुतळे उभारणीच्या कामाचे भूमिपूजन झाले. परंतु तीन वर्षापासून अद्याप कामाला सुरुवातच झाली नाही. ३ वर्षांपूर्वी भुमिपुजन करून मागणी करणारे आणि घोषणा करणारे सत्तेत असुन तातडीने स्मारकांचे काम पूर्ण करण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी आज दि.१४ मे बुधवार छत्रपती संभाजीराजे जयंतीदिनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली जिह्ला परिषदेच्या आवारात धरणे आंदोलन करण्यात येऊन जिह्लाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिह्ला परिषद बीड, कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जिह्ला परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले यावेळी आंदोलनात विभागीय अध्यक्ष संभाजी ब्रिगेड राहुल वायकर,,मराठासेवक संजय गोडसे, बीड जिह्लाध्यक्ष राष्ट्रीय छावा संघटना युवराज मस्के, बीड जिह्लाध्यक्ष बुलंद छावा संघटना विठ्ठल बहिर, मराठा सेवक अशोक सुरवसे, राहुल कवठेकर, शेख मुबीन, रामनाथ खोड, पांडुरंग हराळे, रामकिसन कदम, किशोर निर्मळ,अंगद मांडवे,शाकींदर काटकर, मुरलीधर काटकर आदी सहभागी होते. कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ जि.प.बीड मोमीन सय्यद शकील सय्यद यांनी आंदोलनस्थळी चर्चा करून सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालु आर्थिक वर्ष २०२५-२६ जिह्ला परिषद उत्पन्नातुन तरतूद ५० लक्ष रुपये इतकी करण्यात आली असुन सदरील ईमारतीचे संरक्षण भिंत बांधकाम पूर्ण





झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले. सविस्तर माहितीस्तव ---- जिह्ला परिषदेच्या आवारात छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती राजश्री शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले ,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे अर्धाकृती पुतळे उभारण्याचा ठराव जिह्ला परिषदेच्या सर्वसाधारण सभेत २०१० साली झाला. त्यानंतर पुढे काहीच हालचाल झाली नाही पुढे दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे ,दिवंगत लोकनेते सुंदरराव सोळुंके ,दिवंगत लोकनेत्या केशरकाकु क्षीरसागर यांच्या पुतळ्यांच्या उभारण्याची मागणी पुढे आली. त्यानंतर जिह्ला परिषदेचे नवीन प्रशासकीय इमारत उभारणीचे काम सुरू झाले.नवीन प्रशासकीय इमारतीसमोर पुतळे उभारणीसाठी छत्रपती शंभू प्रेमींनी जिह्लाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. त्यावेळी तत्कालीन जिह्ला परिषद उपाध्यक्ष व विद्यमान खासदार बजरंग सोनवणे तत्कालीन सभापती जयसिंह सोळंके आदींनी नवीन इमारतीच्या आवारात पुतळे उभारण्याचे आश्वासने दिले होते. मागणी आणि घोषणा करणारे सत्तेत ----- महापुरुषांसह लोकनेत्यांच्या पुतळ्यांची मागणी करणारे आणि याबाबत घोषणा करणारे नेते आज एकत्र राज्याच्या सत्तेत आहेत. दि. १९ मार्च २०२२ रोजी तत्कालीन पालकमंत्री धनंजय मुंडे, मंत्री अब्दुल सत्तार, तत्कालीन उपाध्यक्ष बजरंग सोनवणे हे प्रत्यक्ष तर तत्कालीन ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या ऑनलाइन उपस्थितीत जिह्ला परिषदेच्या नव्या इमारतीचे लोकार्पण आणि महापुरुषांच्या पुतळ्यांचे भुमिपूजनही पार पडले. तेव्हाही सत्तेत असलेले मंडळी आत्ताही सत्तेत आहेत. मात्र महापुरुषांच्या पुतळ्या बाबत सरकारला अनास्था का ? असा सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे. पुतळे उभारण्याच्या फायलीचा संथ प्रवास ; शासन, प्रशासन व लोकप्रतिनिधींना सोयरेसुतक नाही --- जिह्ला परिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीचे लोकार्पण करण्यापूर्वी अगोदर पुतळ्यांची उभारणी व नंतरच इमारतीत कारभार अशी भूमिका घेत शंभू प्रेमींनी आंदोलने केली होती. दि.१६ जानेवारी २०२३ रोजी डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत लक्ष्यवेधी आंदोलन केल्यानंतर तत्कालीन सिईओ अजित पवार यांनी चबुत-यासाठी ५ लक्ष रुपये व फेब्रुवारी २०२३ अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली असुन संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करून स्मारकांचे काम सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु पुढे काहीच हालचाल नाही.आज आंदोलन स्थळी कार्यकारी अभियंता बां.वि.क्र.१ मोमीन सय्यद शकील अहमद यांनी जिह्ला परिषद बीड येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता महाराष्ट्र शासन ग्रा.वि.वि.शासन निर्णय क्र.जिपई-२०२२/पत्र.क्र.१०/बां.-४ बांधकाम भवन मुंबई दि.२४.०२.२०२५ अन्वये अंदाजपत्रके रक्कम ३५,५७,५७,५२२ मंजुरी मिळाली असुन सदरील इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाकरिता clause ३५ नुसार मा. अधीक्षक अभियंता सा .बां.मंडळ धाराशिव यांची मंजुरी घेऊन पुढील काम करण्यात येईल. व तसेच सदरील महापुरुषांचे पुतळे बांधण्याकरीता चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ जिह्ला परिषद उत्पन्नामधून तरतूद ५० लक्ष ईतकी करण्यात आलेली आहे. तरी सदर इमारतीचे संरक्षण भिंत बांधकामाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढे ती योग्य ती कारवाई करण्यात येईल असे लेखी दिले आहे. त्यामुळे एकंदरीतच पुतळे उभारण्याच्या फायलीचा प्रवास संथ असुन शासन आणि प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यापैकी कोणालाही सोयरेसुतक नसल्याचे दिसून येते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com